## थोडक्यात पण महत्वाचे



### विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्री करणाऱ्यांवर कारवाई : जयकुमार रावल

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यात शेतकऱ्यांच्या व्यापक हिताचे संरक्षण आणि कृषी उत्पन्न बाजार व्यवस्थेतील पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ अंतर्गत राज्यातील शेतमाल खरेदी-विक्री व्यवहाराचे नियमन करण्यात येते. मात्र राज्यातील काही भागांत अनेक व्यापारी, संस्था तसेच काही शेतकरी उत्पादक कंपन्या कोणत्याही परवान्याविना शेतमाल खरेदी-विक्री करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली. पणन संचालनालयाने यासंदर्भात परिपत्रक जारी केले असून, संबंधितांना वेळोवेळी सूचना देऊनही काही व्यापारी व संस्था विनापरवाना व्यवहार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता कायद्यानुसार आवश्यक परवाना घेतल्याशिवाय शेतमाल खरेदी-विक्रीचा व्यवसाय करता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. शासनाने दि. ५ जुलै २०१६ आणि दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या सुधारित तरतुदींनुसार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात शेतमाल व्यापारासाठी आवश्यक परवाना घेणे बंधनकारक केले आहे. बाजार समितीकडून संबंधित परवाना धारकांकडून बाजार शुल्क आकारले जाणार नसले तरी कायद्यानुसार परवाना घेणे आवश्यक राहणार आहे. कायद्यातील कलम ५ (ड) अंतर्गत थेट पणन, खाजगी बाजार, शेतकरी-ग्राहक बाजार तसेच ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्मसाठी परवाना देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे व्यापारी, संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच इतर संबंधित घटकांनी आवश्यक परवानगीशिवाय शेतमाल व्यापार करू नये, अन्यथा त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिला आहे.

### फळे, भाजीपाला व इतर शेतमाल भेसळखोर 'पणन'च्या रडारवर

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील शेतकरी दर्जेदार फळे, भाजीपाला तसेच इतर शेतमालाचे उत्पादन करतात. मात्र, काही ठिकाणी फळांची गोडी वाढविण्यासाठी, कृत्रिमरित्या पिकविण्यासाठी किंवा अधिक आकर्षक दिसण्यासाठी घातक रसायनांचा वापर केला जात असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त होत आहेत. अशा प्रकारे भेसळ करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली. यासंदर्भात कृषि उत्पन्न बाजार समित्या, खाजगी बाजार समित्या तसेच थेट पणन व्यवस्थेद्वारे होणाऱ्या शेतमाल खरेदी-विक्रीमध्ये भेसळ आणि घातक रासायनिक प्रक्रियांना आळा घालण्यासाठी शासनाने कठोर पावले उचलली आहेत. त्यानुसार पणन संचालनालयाने राज्यातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्या, खाजगी बाजार समित्या आणि थेट पणन परवाना धारकांना महत्त्वपूर्ण परिपत्रक जारी केले आहे. पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला दर्जेदार शेतमाल ग्राहकांपर्यंत सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण स्वरूपात पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. काही ठिकाणी फळे कृत्रिमरित्या पिकविणे, त्यांची गोडी वाढविण्यासाठी रसायनांचा वापर करणे, फळे व भाजीपाल्यांना कृत्रिम रंग देणे तसेच अन्नधान्य अधिक आकर्षक दिसण्यासाठी घातक रसायनांचा वापर केल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. अशा प्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी बाजार समित्यांनी नियमित तपासण्या करून कठोर उपाययोजना कराव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत.

### मुख्यमंत्री यांची 'केपीआयटी'चे अध्यक्ष रवी पंडित यांना श्रद्धांजली

**मुंबई : हॅलो प्रभात**



माहिती तंत्रज्ञानाच्या साह्याने वाहन उद्योगाच्या आधुनिकीकरणात मोलाचे योगदान देणारे पहिल्या फळीतील मार्गदर्शक अशा उद्योजकाचे निधन भारतातील उद्योग-तंत्रज्ञान क्षेत्राची मोठी हानी आहे, अशी भावना व्यक्त करून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केपीआयटी टेक्नॉलॉजीसचे संस्थापक सहअध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रवी पंडित यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, स्व. पंडित यांनी नेहमीच उद्योजकता आणि नावीन्यता यांचा पुरस्कार केला. त्यांनी केपीआयटी टेक्नॉलॉजीसच्या माध्यमातून ऑटोमोटिव्ह, उत्पादन आणि ऊर्जा उद्योगांसाठी माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात पुढाकार घेतला. ते पुणे शहराच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासासासाठी सातत्यपूर्णरित्या प्रयत्नशील राहीले. याशिवाय ते 'जनवाणी' सामाजिक संस्था, 'पुणे इंटरनॅशनल सेंटर', 'आगा खान रुरल सपोर्ट प्रोग्राम' यांच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात सक्रिय राहिले. ते यूके-भारत व्यावसायिक आणि शैक्षणिक संबंधांना प्रोत्साहन देण्यात अग्रभागी होते. ज्येष्ठ उद्योजक पंडित यांच्या निधनामुळे या क्षेत्रातील अभ्यासू आणि दोन पिढ्यांदरम्यानचा दूवा असा मार्गदर्शक हरपला आहे, ही या क्षेत्राची मोठी हानी आहे. पंडित यांच्या निधनामुळे केपीआयटी उद्योग समूह आणि त्यांच्या परिवारावर आघात झाला आहे, या सर्वांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असे नमूद करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ उद्योजक रवी पंडित यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# "एक वर्ष परदेश वारी आणि सोने खरेदी टाळा!"

## पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींचे देशवासीयांना मोठे आवाहन

**मुंबई : हॅलो प्रभात**



पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या जागतिक तेल संकटानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना महत्त्वाचा संदेश दिला आहे. "आजच्या काळाची गरज ओळखून पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा वापर अत्यंत संयमाने करा," असे आवाहन त्यांनी रविवारी केले. हैदराबाद येथे पार पडलेल्या एका कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी तेलंगणामध्ये सुमारे ९,४०० कोटी रुपयांच्या विकासकामांचे उद्घाटन केले. यावेळी संबोधित करताना त्यांनी देशातील ऊर्जा सुरक्षेवर भाष्य केले. सध्या अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक बाजारपेठेत तेलाचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. जगातील सर्वात महत्त्वाचा तेल वाहतूक मार्ग असलेल्या 'होर्मुझची सामुद्रधुनी' (Strait of Hormuz) बंद झाल्याने भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. पंतप्रधान म्हणाले की, "आपल्याला आयात केलेल्या पेट्रोलियम उत्पादनांचा वापर केवळ आवश्यक असेल तेव्हाच करायचा आहे. यामुळे केवळ परकीय चलन वाचणार नाही, तर युद्धाचा आपल्या अर्थव्यवस्थेवर होणारा विपरीत परिणामही कमी होईल." पंतप्रधानांनी यावेळी भारताच्या वाढत्या ऊर्जा सामर्थ्याचाही उल्लेख केला. भारत आज सौर ऊर्जा निर्मितीत जगात आघाडीवर असल्याचे त्यांनी सांगितले. आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सरकारने पुढील पावले उचलली आहेत. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याच्या प्रमाणात मोठी वाढ करण्यात आली आहे. उज्ज्वला योजनेद्वारे गॅस कनेक्शन दिल्यानंतर आता स्वस्त पाइप गॅस पुरवठ्यावर भर दिला जात आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी आणि स्वस्त इंधनासाठी सीएनजी जाळ्याचा विस्तार केला जात आहे.

"जिथे मेट्रो उपलब्ध आहे तिथे तिचा वापर करा. वेगवेगळ्या ठिकाणी जाण्यासाठी कारपूलिंगचा वापर करा आणि मालाची वाहतूक करायची असल्यास रेल्वेचा वापर करा. या सर्वांमुळे पेट्रोल आणि डिझेलवरील अवलंबित्व कमी होईल आणि पर्यायाने परकीय चलनावरील अवलंबित्वही कमी होईल", असं पंतप्रधान म्हणाले. पंतप्रधानांनी लोकांना "एक वर्षासाठी परदेश प्रवास पुढे ढकलण्यास" सांगितले आणि "सणासुदीच्या काळात एक वर्ष सोने खरेदी करू नका" असेही म्हटले. त्यांनी लोकांना स्वयंपाकाच्या तेलाचा वापर कमी करण्याचे आवाहनही केले. "मी सांगत आलो आहे की, 'स्वयंपाकाच्या तेलाचा वापर १० टक्क्यांनी कमी करा.' यामुळे या काळात देशाला तर मदत होईलच, शिवाय तुमच्या कुटुंबाचे आरोग्यही सुधारेल," असे मोदी म्हणाले. आत्मनिर्भरतेच्या विषयावर जोर देत पंतप्रधान म्हणाले, "तुम्ही रोजच्या वापरातील वस्तूंची यादी करा आणि त्यांपैकी परदेशी वस्तू कोणत्या आहेत ते शोधा." याचा अर्थ असा नाही की लोकांनी परदेशी वस्तू फेकून द्याव्यात, असे ते म्हणाले आणि पुढे म्हणाले, "परंतु शक्य तितक्या लवकर आत्मनिर्भरता निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू असले पाहिजेत."

सुमारे १,७०० कोटी रुपये खर्चून उभारलेले हे देशातील पहिले पूर्णतः कार्यरत 'पीएम मित्रा पार्क' आहे. केंद्राच्या '5F' व्हिजन (Farm to Fibre to Factory to Fashion to Foreign) अंतर्गत हे पार्क कापूस उत्पादक शेतकऱ्यांपासून ते निर्यातीपर्यंतची संपूर्ण साखळी मजबूत करेल, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल. ही काकतिया मेगा टेक्सटाइल पार्कची काही प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. पंतप्रधानांनी या माध्यमातून केवळ ऊर्जा बचतीचा मंत्र दिला नाही, तर भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी पायाभूत सुविधांचे महत्त्वही अधोरेखित केले.

### तेलंगणाला विकासकामांची भेट

**पंतप्रधानांनी या दौऱ्यात अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांचे लोकार्पण केले. यामध्ये काझीपेट-विजयवाडा रेल्वे मार्ग, हैदराबादमधील नवीन पेट्रोलियम टर्मिनल आणि वारंगल येथील 'पीएम मित्रा पार्क' (काकतिया मेगा टेक्सटाइल पार्क) चा समावेश आहे.**

## फटका बसलेल्या नुकसानग्रस्तांना तात्काळ मदत द्यावी : तटकरे



### नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

**मुंबई : हॅलो प्रभात**

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथे अनेक ठिकाणी झालेल्या वादळी वाऱ्यांमुळे शेती पिकांचे, घरांचे तसेच अन्य मालमत्तेचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त भागांमध्ये तात्काळ पंचनामे करून बाधित नागरिकांना मदत पोहोचविण्याचे निर्देश महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे तसेच सर्व संबंधित प्रांताधिकाऱ्यांना दिले आहेत.

प्रशासनाने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले असून नागरिकांच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे. आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक ती मदत तातडीने उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. कोणताही धोका किंवा आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी तात्काळ स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा असे आवाहनही करण्यात आले आहे. या संकटाच्या काळात शासन नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे असून सर्व यंत्रणा नागरिकांच्या सुरक्षेसाठी सज्ज असल्याचे प्रशासनाने कळविले आहे.

## सिंधी समाजाचे सर्वच क्षेत्रात मोलाचे योगदान – मुख्यमंत्री

### सिंधी समाज बांधवांना मालकी पट्ट्यांचे वाटप : ३५० सिंधी बांधवांना पट्टे वाटप

**नागपूर : हॅलो प्रभात**

निर्वासित म्हणून भारतात दाखल झालेल्या सिंधी समाजाने शून्यापासून सुरुवात केली. आज देशाच्या व्यापार क्षेत्रासह सर्वच क्षेत्रामध्ये हा समाज आघाडीवर असून देशाच्या विकासात मोलाचे योगदान देत आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे काढले.

विदर्भ सिंधी विकास परिषदेच्या वतीने जरीपटका येथील महात्मा गांधी हायस्कूलच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या कार्यक्रमात सिंधी बांधवांना मालकी पट्ट्यांचे वितरण करण्यात आले. तसेच, समाजातील नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मंचावर भगवानदास सवनानी, आमदार कुमार आयलानी, अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, भारतीय सिंधू सभेचे राष्ट्रीय संरक्षक घनश्याम कुकरेजा, सिंधी विकास परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनकी रूघवानी, संयोजक वीरेंद्र कुकरेजा, सचिव पि.टी. दारा आदी उपस्थित होते. यावेळी ३६ नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यापैकी १२ नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात करण्यात आला.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, देशाच्या फाळणीनंतर या समाजाला घर, शेती, व्यापार सोडून विस्थापित होऊन भारतात यावे लागले. त्याचप्रमाणे अनेक वर्ष या समाज बांधवांना निर्वासितांच्या शिबिरामध्ये घालवावी लागली. समाजाने आपले दुःख हे संघर्षाचे शस्त्र बनवले. आज हा समाज सर्व क्षेत्रात आघाडीवर असून देशाच्या विकासात अत्यंत मोलाचे योगदान देत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सिंधी बांधवांना नागरिकत्व प्रदान करण्याचे देशभरात अभियान राबवले गेले. सिंधी बांधव वास्तव्यास असलेल्या जमिनी अतिक्रमण ठरत होत्या. त्यामुळे सिंधी बांधवांना मालकी पट्टे मिळावे, अशी मागणी सुरू होती. संधी मिळताच आम्ही या प्रश्नावर तोडगा काढला आणि सिंधी बांधवांना वर्ग एकच्या शंभर टक्के मालकी हक्काचे पट्टे देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात सिंधी बांधवांना मालकी हक्काचे पट्टे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. आगामी काळातही अत्यंत वेगाने या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल. तसेच उल्हासनगर येथील सिंधी बांधवांसाठी वेगळ्या पद्धतीने नियमितीकरण करण्याचा निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी बोलताना दिली. विनकी रुघवाणी यांनी प्रास्तविक केले. विकी कुकरेजा यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.




**भारताच्या फाळणीनंतर पश्चिम पाकिस्तानातून आलेल्या सिंधी विस्थापितांचे नागपूर जिल्ह्यातील खामला, मेकोसाबाग व जरीपटका या भागात पुनर्वसन करण्यात आले. या तीन वसाहतींना अधिकृत विस्थापित वसाहतीचा दर्जा देण्यात आला. अनेक विस्थापित कुटुंबे मागील 70 -75 वर्षांपासून येथे वास्तव्यास असून त्यांनी नागपूरच्या आर्थिक, सामाजिक व व्यापारी विकासात मोठे योगदान दिले. आज 350 सिंधी बांधवांना मालकी हक्काचे पट्टे वाटप करण्यात आले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बारा जणांना प्रातिनिधिक स्वरूपात पट्टे वाटप करण्यात आले.**

# संविधानामुळेच सर्वसमावेशक विकास शक्य – मंत्री संजय शिरसाट

## आकाशात उजळला महामानवाच्या तेजाचा प्रकाश; ड्रोनच्या भव्य रोषणाईतून मानवंदना

**मुंबई : हॅलो प्रभात**



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या देशाच्या प्रगतीचे शिल्पकार आहेत. शिक्षण, समानता आणि सामाजिक न्याय यांचे महत्त्व त्यांनी समाजाला पटवून दिले, त्यांच्या विचारांचा प्रभाव प्रत्येकाच्या जीवनात जाणवतो. समाजातील पुढील पिढ्यांपर्यंत बाबासाहेबांचा विचार पोहोचवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. त्यांनी दिलेल्या संविधानामुळेच सर्वसमावेशक विकास शक्य असल्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती उत्सवानिमित्त शिवाजी पार्क दादर येथे प्रथमच ड्रोन शो व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार सर्वश्री अमित साटम, योगेश सागर, प्रसाद लाड, कॅप्टन आर. तमिळ सेल्वन, महापौर रितू तावडे, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, सिद्धिविनायक न्यासाचे अध्यक्ष सदा सरवणकर,भन्ते डॉ.राहुल बोधी महाथेरो व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

मंत्री शिरसाट यांनी, डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भरविण्यात येणाऱ्या पुस्तक प्रदर्शनांचा विशेष उल्लेख करत, बाबासाहेबांचे विचार समजून घेणे आणि आत्मसात करण्यासाठी वाचनाची सवय जोपासावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. डॉ. आंबेडकर यांच्या जयंती आणि महापरिनिर्वाण दिनी लाखो अनुयायी एकत्र येऊन अभिवादन करतात, ही त्यांच्या कार्याची खरी पोचपावती असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला दया, क्षमा आणि शांतीचे मूल्य दिले. समानता, समान संधी आणि सामाजिक जबाबदारी यांवर आधारित त्यांचा विचार आजही मार्गदर्शक ठरत आहे. त्यांच्या विचारांवर चालणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या यशाची गुरुकिल्ली त्यांच्या तत्त्वज्ञानातच दडलेली आहे. भारतीय संविधान हे जगासाठी मार्गदर्शक ठरणारे असून, त्यावर उभारलेली लोकशाही व्यवस्था, प्रशासकीय यंत्रणा आणि राजकीय व्यवस्था ही समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचविण्याचे काम करत आहे.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान व त्यांच्या विचारांमुळेच समाजातील सर्व घटकांना समान हक्क आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळाली आहे. ड्रोन शो या अभिनव उपक्रमांतून नागरिकांना आकाशात त्यांच्या कार्याचे नेत्रदीपक दर्शन घडले. त्यांच्या विचारांचा जागर देशभरासह जागतिक स्तरावर होत असून, अशा अभिनव उपक्रमांतून नव्या पिढीपर्यंत त्यांचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या ड्रोन शोद्वारे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखे अभिवादन करण्यात आले. सुमारे २००० ड्रोनच्या सहाय्याने आकाशात साकारण्यात आलेली प्रकाशचित्रे आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. या प्रकाशचित्रांमध्ये डॉ. आंबेडकरांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण टप्पे प्रभावीपणे उलगडण्यात आले. तसेच भारतीय संविधानाचे महत्त्व अधोरेखित करणारी विलोभनीय दृश्ये साकारण्यात आली.

महामानवाने घडविलेल्या सामाजिक क्रांतीचा प्रेरणादायी प्रवासही या ड्रोन शोमधून जिवंत करण्यात आला.

यावेळी गायिका वैशाली माडे यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.